निवडणूक/तात्काळ.

क्रं.कार्या-10/निवडणूक/म.नों./आरआर- 606/2017.
जिल्हा निवडणूक अधिकारी, कोल्हापूर.
दिनांक:- 14/06/2017

प्रति,

मा.प्राचार्य ,
(सोबत जिल्हातील सर्व कॉलेजची यादी
जोडलेली आहे.)

विषय :- तरुण व पात्र प्रथम मतदारांची (वयोगट 18 ते 21 वर्षे)
मतदार नोंदणी करण्यासाठी विशेष मोहिम कॉलेज मध्ये
राबविणे बाबत

संदर्भ :-1) मा. मुख्य निवडणूक अधिकारी मुंबई यांचे कडील
पत्र क्र ईएलआर/2017/प्र.क्र.348/17/33 दिनांक 4 मे 2017
2)उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे कडील शासन
आदेश क्र संकीर्ण 2016/प्र.क्र.683/16/विशी-3 दिनांक 15 मे 2017

मा. मुख्य निवडणूक अधिकारी मुंबई यांनी उपरोक्त संदर्भीय पत्राने दिनांक 1 जुलै 2017 ते 31 जुलै 2017 अखेर तरुण् व पात्र मतदारांची (वयोगट 18 ते 21 वर्षे) मतदार नोंदणी करण्यासाठी विशेष मोहिम राबविणे बाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच सोबत पत्र आहे.

तसेच उपरोक्त संदर्भ क्रमांक 2 ने शालेय शिक्षण विभागाने शासन आदेश दिलेले आहेत की, नवतरुण मतदारांना महाविद्यायीन प्रवेश घेतेवेळी प्रवेश अर्जासोबत नमुना क्र 6 देणे बंधनकारक करावे. तसेच 11 वी व 12 वी चे विद्यार्थी यांचेकडून प्रतिज्ञापत्र भरुन घेणे बाबतच्या सूचना ही दिलेल्या आहेत. सोबत शासन आदेशाची प्रत जोडलेली आहे.

मा. निवडणूक आयुक्त यांनी सर्व जिल्हाधिकारी व सर्व कुलगुरु यांची दिनांक 5/6/2017 रोजी व्ही. सी झालेली आहे, त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारीसो यांची मा. कुलगुरु शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेशी सविस्तर चर्चा झालेली आहे. मा.कुलगुरु हे आपले स्तरावर आपणास फॉर्म ॲडमिशन फॉर्म क्रं. 6 सोबत जोडून भरुन घेणे बाबतच्या सूचना देणार आहेत.

मतदार नोंदणी करणेसाठी आपणास.कॅम्पस ॲम्बेसिडर व मतदार नोंदणीसाठी Nodal Officer म्हणून नेमणूक केलेली आहे. तसेच आपल्या कॉलेज मधील एका विदयार्थ्याला याला स्टुडन्ट ॲम्बेसिडर नेमण्यात आलेले आहे. त्यांचे मदतीने आपले कॉलेज मधील 12 वी नंतरच्या सर्व ॲडमिशनच्या वेळी फॉर्म सोबत मतदार यादी नांव नोंद करणेचा नमुना क्रमांक 6 जोडण्यात यावा व ॲडमिशन घेते वेळी सदरचा नमुना क्रं. 6 भरुन घेण्यात यावा. आपले कॉलेजला फॉर्म पुरविणे बाबत सर्व तहसिलदार यांना सूचना दिलेल्या आहेत. तसेच ॲडमिशनच्या तारखा संबंधित तहसिलदार यांना कळविण्यात याव्यात. ॲडमिशनच्या वेळी नमुना 6 फॉर्म जमा करणेसाठी बीएलओ यांची नेमणूक केलेली आहे. ते फॉर्म जमा करुन पुढील कार्यवाही करतील. फक्त् आपणास ॲडमिशन फॉर्म सोबत फॉर्म नंबर 6 जोडणेचा आहे. याबाबत प्रेस कॉन्फरन्स घेवून सदरची बातमी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तसेच कांही विदयार्थी यांचे नांव मतदार यादीत असल्यास त्याचा यादी भाग क्रं.व अ.क्रं ही प्राप्त करुन घेण्यात यावा याबाबत मा. कुलगुरु यांनी ॲडमिशनच्यावेळी अर्जात यादी भाग क्रं व अ.क्रं नोंद करावा असे चर्चेमध्ये सांगितले आहे.

शिवाजी विदयापीठ अंतर्गत कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयाचे व इती जिल्हयातील जे विदयार्थी ॲडमिशन घेतात तरी इतर जिल्हयाचे अर्ज प्राप्त झाल्यास ते प्राप्त करुन घेवून त्या त्या जिल्हयाला पाठविणेची कार्यवाही इकडून करीत आहोत.

**उपजिल्हाधिकारी व**
**उपजिल्हानिवडणूक अधिकारी**
**कोल्हापूर**

**प्रत,**

1) मा. जिल्हाधिकारीसो यांचे स्वीय सहाय्यक यांना माहितीसाठी
2) मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी करवीर/पन्हाळा/इचलकरंजी/गडहिंग्लज/आजरा-भुदरगड/राधानगरी-कागल.
3) सहा. मतदार नोंदणी अधिकारी, 274-कोल्हापूर (दक्षिण) विधानसभा मतदार संघ तथा उपायुक्त-1, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर.
4) सहा. मतदार नोंदणी अधिकारी, 276-कोल्हापूर (उत्तर) विधानसभा मतदार संघ तथा उपायुक्त-2, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर.
5) सहा. मतदार नोंदणी अधिकारी, 276-कोल्हापूर (उत्तर) विधानसभा मतदार संघ तथा तहसिलदार (महसूल), कोल्हापूर.
6) सहा.मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार करवीर/गगनबावडा/पन्हाळा/शाहुवाडी/हातकणंगले/शिरोळ/गडहिंग्लज/ चंदगड/आजरा/ भुदरगड/राधानगरी/कागल.